कार्यालय
# नगर परिषद, नागभीड
ता. नागभीड जिल्हा - चंद्रपुर
Email ID:- mcnagbhid@gmail.com    Ph No. 07179-240170

क्र.नपना/मुअ/२०२५/ १८२०    दिनांक :- १४/०८/२०२५

**आदेश / महत्वाचे**

**प्रति,**

श्री. मोरेश्वर येरणे , क.लिपिक
नगरपरिषद नागभीड

विषय : प्रारूप प्रभाग रचना संबंधात नागरिकांचे हरकती व सूचना स्वीकारण्याबाबत.

संदर्भ: १)नगर विकास विभाग आदेश क्र. एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दिनांक १० जून २०२५
२)मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र क्र.नपाप्र/१९(३)/कावि-६९७/२०२५ दिनांक १४/०८/२०२५
३)नगर विकास विभाग आदेश क्र. एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दिनांक १४ ऑगस्ट २०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भीय क्र. २ चे आदेशान्वये नागभीड नगरपरिषदेच्या प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता प्रदान करण्यात आलेली असून संदर्भ क्र. ३ अन्वये प्रारूप प्रभाग रचना राजपत्र, वृत्तपत्र व कार्यालयीन नोटीस बोर्ड वर दिनांक १८/०८/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने प्रारूप प्रभाग रचणेकरिता नागरिकांचे हरकती व सूचना स्वीकारण्याबाबत आपणास आदेशित करण्यात येत आहे.

त्यानुषंगाने प्राप्त हरकती व सूचनांबाबत संबंधिताना पोचपावती देण्यात यावी, पोचपावती देतेवेळी पोच पावतीवर त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद करावे. तसेच प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी व तसा अहवाल सादर करावा. प्रारूप प्रभाग रचना सबंधित हरकत व सूचना स्वीकारण्याचा कालावधी : दि. १८/०८/२०२५ ते दि. ३१/०८/२०२५ (दु. ३.०० वा.) पर्यंत आहे.

सदर काम हे निवडणूक सबंधित असल्याने यात कोणत्याही प्रकारची हयगय केल्यास उचित कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगर परिषद नागभीड